१३ मे २००६

महाराष्ट्र टाइम्स

मंथन

चौथी भिंत

लव्ह स्टोरी

# हीच तर 'या' प्रेमातली गंमत आहे!

जयंत पवार

jayant.pawar@timesgroup.com

एक तो, एक ती. कारणपरत्वे त्यांची पडते गाठ. तो होतो घायाळ. तिला गटवायचे, लग्न करायचे विचार त्याच्या मनात येतात. तो एकेक प्लॅन बनवत जाळी फेकतो, पण ते सगळे फसतात. दरम्यान तिच्याही मनात चलबिचल होत चालली आहे. तिला तो आवडू लागतो. लग्नाचेही विचार



मनात येतात. पण आधी कोणी विचारायचं ह्या भानगडीत सारंच बिनसायला लागतं आणि प्रकरण इथेच थांबतं की काय अशी परिस्थिती निर्माण होते. तोच...

अतिशय तरल संवेदनांनी, हळव्या भावनांनी, उसासे-सुस्कारे, कोवळा प्रणय आणि काव्यमय संवादांनी फुलवलेली ही कथा 'लव्हस्टोरी' या नावाने सादर करता येईल. तसा रिवाज आहे. पण सध्या आपण 'लव्हस्टोरी' या नावाने रंगभूमीवर आलेलं नाटक पाहातो ते मात्र या रिवाजाला धरून सादर झालेलं नाही. प्रत्येक लव्हस्टोरीत अपरिहार्य असलेला इमोशन्सचा कल्लोळगुंता यात जवळ जवळ वजा आहे. हेच त्याचं वेगळेपण. बाकी गोष्ट तीच. पण हळवेपणाचा वारा अंगाला लागू न देता शांतपणे प्रेमाच्या प्रक्रियेचं डिसेक्शन करत रचलेली 'सुयोग' निर्मित डॉ. विवेक बेळे विरचित प्रेमप्रकर्णाची हीच तर खरी गंमत आहे.

कोणीएक निनाद भागवत नावाचा एका मल्टिनॅशनल कंपनीचा मार्केटिंग मॅनेजर आणि कोणीएक स्मिता जोशी नावाची जाहिरात कंपनीची मालकीण यांच्या प्रेमाची ही गोष्ट. त्याने बिझनेस मॅनेजमेंटचे रूल्स खाजगी आयुष्यातल्या गोष्टींना लावणं आणि तिने प्रत्येक गोष्ट प्रॉडक्ट मानून ॲडकन्सेप्टमधूनच तिचा विचार करणं या गोष्टी आजच्या, म्हणजे ग्लोबल काळाला साजेशा आहेत. अगदी नात्यातही रोखठोक व्यवहार बघणाऱ्या काळातल्या माणसांची ही गोची आहे. ती त्यांच्या व्यावसायिक संकल्पनांच्या भाषेत मांडली जाते, तेव्हा ताजी वाटते.

दुसरी गंमत फॉर्मची आहे. निनाद आणि स्मिता या दोघांबरोबर त्यांची मनंही वावरतात. नाटकाच्या पूर्वार्धात निनाद स्मिताला पटवू बघतो तेव्हा या दोन्ही मनांची तोंडं विरुद्ध दिशेला असतात आणि दुसऱ्या अंकात जेव्हा स्मिता आणि निनाद यांच्यात दुरावा निर्माण होतो आहेसं वाटतं, तेव्हा मात्र ही मनं एकमेकांच्या प्रेमात पडलेली असतात. शरीर आणि मनाची फारकत हा डायलेमाही आजच्या काळातला आहे. पण ही फारकत अनेकदा इतकी ताणली जाते की ती त्यांची मनं नसून दुसरीच दोन पात्रं आहेत असं वाटतं.

हे नाटक 'नेव्हर माइंड' या नावाने पूर्वी समांतर रंगभूमीवर छोट्या नाट्यगृहात सादर झालं होतं. तेव्हा ते भलतंच रंगतदार वाटत असे. हेच नाटक व्यावसायिक नाट्यगृहात मोठ्या रंगमंचावर येतं, तेव्हा काही समीकरणं नक्कीच बदलतात. छोट्या रंगमंचावकाशात चपखल बसणारं हे नाटक मोठ्या अवकाशात खेळवताना दिग्दर्शक किरण पोत्रेकरांनी मुख्य आधार घेतलाय तो नेपथ्याचा. प्रदीप मुळ्येंचं रंगीबेरंगी क्युबिकल्सचं नेपथ्य अवकाश भरून टाकतं. त्यातले गडद रंग, मोठाली अक्षरं आणि आकर्षक मांडणी ही मुख्य पात्रांच्या बिझनेस वर्ल्डशी थेट नातं सांगतातच; पण 'स्पेसचं करायचं काय?' या प्रश्नाचंही उत्तर देतात. त्यामानाने पोत्रेकरांनी पत्कींचं संगीत पुरेशा प्रमाणात वापरलेलं नाही. दोन माणसं भेटतात, बोलतात, मधे एक टेबल, अशी नाटकाची रचना बहुतेक भागात आहे. पात्रांच्या हालचालींवर मुळातच मर्यादा आहेत. अशावेळी संवादांतलं नाट्य हेरण्याची जबाबदारी दिग्दर्शकावर येऊन पडते. पोत्रेकरांनी ही जबाबदारी कधी नीट पेलली आहे, तर कधी सोडून दिलेली आहे. पात्रांचे वेगवेगळे आवाज कधीकधी ऐकू येईनासे होतात आणि मग नाटक रेंगाळल्यासारखं वाटतं. पण संहितेतल्या वेगळ्या वाटा नाटकाला तारतात आणि मोठी हानी होऊ देत नाहीत.

मंगेश कदम, सारिका निलाटकर, हृषीकेश जोशी आणि मीरा वेलणकर हे चारही कलावंत आपल्या भूमिका चोख करतात. पण भूमिका चोख करणं एवढंच इथे पुरेसं नाही, हेही सांगितलं पाहिजे. मंगेश कदम निनादच्या फसगतीतल्या मधल्या जागा अप्रतिम भरतात. दारू पिण्याच्या सीनमध्ये धमाल करतात.

पण या व्यक्तिरेखेच्या ठायी हवा असणारा बिझनेसमनचा कोरडेपणा कदमांच्या भूमिकेत 'मिसिंग' आहे. अर्थात उत्तरार्धात त्यांना भूमिकेची नस सापडते. सारिका निलाटकरांनी संवादातल्या गंमती अजून शोधून त्यात वैविध्य आणायला हवं. मीरा आणि हृषीकेश यांनी स्मार्ट अदाकारीने मजा आणली आहे. पण मीराचा त्रासिक भाव आणि हृषीकेशचा कधी कधी डोकावणारा तटस्थपणा त्यांच्या भूमिकेचा आलेख चढता ठेवण्यास बाधक ठरतो. एका वेगळ्या प्रकृतीच्या अभिनयाची गरज असणाऱ्या या नाटकाला भिडण्याचा या चारही कलावंतांचा प्रयत्न मात्र स्तुत्य आहे.

***निर्मिती :*** *सुयोग,* ***लेखक :*** *डॉ. विवेक बेळे,* ***दिग्दर्शक :*** *किरण पोत्रेकर,* ***नेपथ्य :*** *प्रदीप मुळ्ये,*
***संगीत :*** *अशोक पत्की,* ***प्रकाश योजना :*** *रवी रसिक,*
***कलावंत :*** *मंगेश कदम, सारिका निलाटकर, हृषीकेश जोशी, मीरा वेलणकर, महेश बोडस.*
दर्जा : ***

अति उत्कृष्ट ★★★★★ उत्कृष्ट ★★★★ चांगला ★★★ बरा ★★ वाईट ★